नवरात्रीच्या देवीचे
पाचवे रूप
स्कंदमाता देवी



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

उद्याचा रंग आहे,
हिरवा

वर्ष : ०६ | अंक : ६२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार !

## ५ हजार रुपये अग्रीम रक्कम खात्यात जमा होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजारांची अग्रीम मदत जमा करण्याची घोषणा केली आहे. मागील २५ वर्षांचा रेकॉर्ड काढला तर तुमच्याही लक्षात येईल, आपण कधीही दुष्काळ नोव्हेंबरमध्ये जाहीर करतो आणि त्याची मदत डिसेंबरमध्ये देण्यात येते.

मात्र, यंदा दुष्काळाची परिस्थिती पाहता आपण लवकर दुष्काळ जाहीर केला. दुष्काळाचा जीआर आपण ऑक्टोबर महिन्यात काढला. आज सप्लिमेंटरी जीआर काढला आहे. आता दिवाळी येत आहे, याची आम्हाला कल्पना आहे. दुष्काळाची जी कार्यप्रणाली आहे, त्याचे संपूर्ण काम दिवाळीपूर्वी पूर्ण होऊ शकत नाही. मात्र सगळी परिस्थिती विचारात घेता, मी आणि आपले दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी मंत्रिमंडळातील इतर सहकाऱ्यांशी चर्चा केली आहे की,



शेतकऱ्यांना आपल्याला दुष्काळाबाबत जी मदत करायची आहे, ती पुढील काळात करूच, पण त्यातील अग्रीम म्हणून ५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी जमा करू, असं मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी जाहीर केलं आहे.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक आज पार पडली. या बैठकीनंतर माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात दुष्काळाची परिस्थिती आहे. या परिस्थितीत पहिल्यांदा आपण २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. त्यानंतर काही तालुक्यांतून तक्रारी आल्या होत्या.

त्यामुळे आपण ट्रिगर १ आणि ट्रिगर २ चा आढावा घेऊन एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. ४० तालुके हे यादीत वाढले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ज्या ज्या भागातील बळीराजा दुष्काळाम ुळे होरपळून निघाला आहे त्या त्या भागातील शेतकऱ्यांना दुष्काळासाठी आपण जाहीर केलेल्या १२ सवलतींचा लाभ मिळणार आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

कर्जमाफीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत. पिण्याचे पाणी देणाऱ्या टँकर्सची संख्या वाढत आहे. बळीराजाच्या हातात दिवाळीसाठी पैसे देणार आहोत. विजेच्या बिलाचा तगादा नाही, कुठे कोणी अतिउत्साह दाखवला असेल तर कारवाई करू. शेतकऱ्यांचा चारा हम ीभावाने खरेदी करू, असंही मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी आश्वस्त केलं आहे.

दरम्यान, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून मागील २५ वर्षांत केलेली अथक राष्ट्रसेवा आणि यामध्ये गरीब आणि वंचितांना समोर ठेवून जे कार्य केलंय, त्याचा उल्लेख या ठरावात करण्यात आला आहे, असं मुख्यमंत्री Devendra Fadnavis म्हणाले.

# दुष्काळाने शेतकरी उद्ध्वस्त!

### पाच हजारांची मदत म्हणजे जखमेवर मीठ

## शेतकऱ्यांना किमान ५० हजार रुपये द्या...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, सोयगाव (छ.संभाजीनगर):** राज्य सरकारच्या दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देण्याच्या वृत्तावर सोयगाव येथील शेतकरी बांधवांनी व्हॉट्सअॅप पोस्टद्वारे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना पाच हजारांची मदत म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखा प्रकार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.सोयगाव तालुक्यात पावसाअभावी मका, कापूस, सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघालेला नाही. त्यात कर्जाचा डोंगर, मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे.पाच हजार रुपयांत दोन खतांच्या बॅगाही येत नाहीत. दिवाळीसाठी तेल, साखर, रवा, मैदा, फराळाचे साहित्य, मुलांचे कपडे आणि इतर खर्च कसा भागवायचा? एवढ्या तुटपुंज्या रकम ेत शेतकऱ्यांची दिवाळी गोड कशी होणार, असा संतप्त सवाल शेतकरी बांधवांनी उपस्थित केला.सरकारने शेतकऱ्यांची दिवाळी खऱ्या अर्थाने गोड करायची असेल, तर प्रत्येक दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या खात्यात किमान ५० हजार रुपये जमा करावेत, अशी मागणी सोयगाव येथील शेतकरी संघटनेने केलेली आहे.

# घुग्घूसमध्ये ट्रक पेटवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश !

## केव्हीआर कंपनीचा ट्रक पेटवून चालकाला मारहाण ; ४ फरार आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घूस पोलीस स्टेशन हद्दीत ट्रक अडवून चालकाला मारहाण करीत ट्रक पेटवून देण्याच्या गंभीर घटनेचा घुग्घूस पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) चंद्रपूर यांनी संयुक्त कारवाईत पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात घटनेनंतर फरार असलेल्या चार आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडविणाऱ्या घटनेचा तपास म हत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे.

दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री नकोडा ते बहिरांबाबा मंदिरादरम्यान असलेल्या डंपर रोडवर काही अज्ञात इसमांनी केव्हीआर कंपनीचा ट्रक (क्रम ांक एमएच- ३४ सीक्यू ३३८५) अडविला. त्यानंतर ट्रक चालकाला जबरदस्तीने खाली उतरवून त्याला मारहाण करण्यात आली आणि ट्रकला आग लावून मोठे नुकसान करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती.

याप्रकरणी ट्रक चालकाच्या तोंडी रिपोर्टवरून

**अटक करण्यात आलेले चार आरोपी**

१. समशेर मेहबूब शेख
२. खुर्शीद इकराम खान
३. आफताब नफिस अहेमद
४. इरफान रफिक शेख

घुघूस पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक २९७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२६(एफ), १२६(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तांत्रिक तपास अन् गुप्त माहितीने आरोपी जेरबंद!

गुन्हा घडल्यानंतर चारही आरोपी फरार झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी घुग्घूस पोलीस आणि एलसीबी चंद्रपूरच्या पथकाने गुप्त माहितीदारांच्या म दतीने तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरविली. मिळालेल्या अचूक माहितीच्या आधारे दि. ९ आणि १० ऑक्टोबर २०२६ रोजी संयुक्त कारवाई करण्यात आली. या कारवाईत चारही आरोपींना अटक करून पोलिसांनी गुन्ह्याचा उलगडा



केला.

**पोलीस पथकाची उल्लेखनीय कामगिरी !**

चंद्रपूर पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये व पोलीस निरीक्षक प्रकाश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत पीएसआय रवींद्र वाघ, पोलीस हवालदार अनिल बैठा, राकेश तुराणकर, विशाल हूड, पोलीस अंमलदार महेश भोयर, प्रसन्ना डोरलीकर, पवन डाखरे, रवींद्र शेंडे आणि तोताराम ठाकरे यांनी सहभाग घेतला.

ट्रक पेटविण्याच्या या गंभीर प्रकरणात चार फरार आरोपींना अटक करण्यात घुग्घुस पोलिस आणि एलसीबी पथकाला यश आले असून, आरोपींचा पुढील कायदेशीर तपास घुग्घूस पोलीस करीत आहेत.

# डहाणूत ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत विविध शासकीय योजनांचा लाभ



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१४, डहाणू (पालघर) :** सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा, विविध शासकीय दाखले व कागदपत्रांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत आणि प्रशासनाच्या सेवा थेट जनतेपर्यंत पोहोचाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत डहाणू येथे विविध शासकीय कागदपत्रांचे वितरण व कृषी साहित्याचे वाटप करण्यात आले. डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वनपट्ट्यांशी संबंधित सात-बारा उतारे, महिला शेतकरी प्रमाणपत्रे, रेशनकार्ड तसेच पॉवर टिलरच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले.शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविणे, प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुलभ करणे आणि नागरिकांच्या प्रलंबित कामांना गती देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार डहाणू येथे आयोजित विशेष शिबिरात विविध शासकीय विभागांच्या माध्यम ातून नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. एकाच ठिकाणी विविध विभागांशी संबंधित कामे मार्गी लावण्याची संधी मिळाल्याने नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

या कार्यक्रमात आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते वनपट्ट्यांशी संबंधित सात-बारा उताऱ्यांचे वितरण करण्यात आले. जमिनीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध झाल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळण्यास मदत झाली. तसेच महिला शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक कामांसाठी उपयुक्त ठरणारी शेतकरी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. पात्र नागरिकांना रेशनकार्डांचेही वाटप करण्यात आले.ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविताना अनेकदा कागदपत्रांची पूर्तता, कार्यालयीन प्रक्रिया आणि वारंवार होणारी धावपळ यांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरत आहे.

शेतीची कामे अधिक सुलभ व्हावीत आणि शेतकऱ्यांना आधुनिक कृषी साधनांचा उपयोग करता यावा, या दृष्टीने कार्यक्रमात लाभार्थ्यांना पॉवर टिलरच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले. शेतीच्या विविध कामांसाठी उपयुक्त असलेल्या या यंत्रामुळे शेतकऱ्यांना श्रम व वेळेची बचत करण्यास मदत होऊ शकते. पारंपरिक शेतीसोबत आधुनिक साधनांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या उपक्रमांना महत्त्व आहे.या विशेष शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांना आवश्यक कागदपत्रे मिळवून देणे, संबंधित अर्ज व प्रशासकीय कामकाजाबाबत सहकार्य करणे आणि विविध विभागांच्या सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, यावर भर देण्यात आला.या वेळी तहसीलदार सुनील कोळी, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते, नायब तहसीलदार सीमा पुजारी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शासनाच्या विविध योजना आणि सुविधांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळवून देणे आणि शासकीय कामकाजातील अडचणी कमी करणे, यासाठी अशा अभियानांची भूमिका महत्त्वाची आहे. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील शेतकरी, महिला आणि वनपट्टाधारकांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाल्यास त्यांना पुढील शासकीय प्रक्रियांसाठी मदत मिळू शकते.

डहाणू येथे आयोजित ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत विविध कागदपत्रांचे वितरण आणि कृषी साहित्याचा लाभ देण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

# लासलगावकरांचा महावितरणला ‘गुलाबपुष्प’ देऊन इशारा!

## वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि अंदाजे बिलांच्या मनमानी कारभाराविरोधात संताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, लासलगाव (नाशिक) :** सध्या सुरू असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवाच्या धामधुमीत लासलगाव शहरात गेल्या तीन-चार दिवसांपासून दररोज संध्याकाळी चार ते पाच तास वीज गायब होत असल्याने नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. सणासुदीच्या दिवसांत नागरिकांना अंधारात ठेवणाऱ्या महावितरणच्या या मनमानी कारभाराविरोधात लासलगाव शहर विकास समितीने आक्रमक पवित्रा घेत अनोख्या 'गांधीगिरी' मार्गाने आंदोलन छेडले. समितीच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना थेट गुलाबपुष्प देऊन समस्यांचा पाढा वाचत मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले.

**अंदाजे बिलांचा आर्थिक भुर्दंड; जुनी मीटर्स बदलण्याचा बनाव?**

ज्या ग्राहकांकडे अद्याप स्मार्ट मीटर बसवलेले नाहीत, त्यांच्या प्रत्यक्ष मीटरचे रीडिंग न घेताच महावितरणकडून परस्पर २०० ते ३४० युनिट्सची अंदाजे बिले पाठवली जात असल्याचा गंभीर आरोप शहर विकास समितीने केला आहे. त्यानंतर मीटर नादुरुस्त असल्याचे कारण पुढे करून जुनी मीटर्स काढून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्याचा सपाटा लावला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या अंदाजे बिलांची अव्वाच्या सव्वा रक्कम भरण्यासाठी ग्राहकांवर दबाव आणला जात असून, या संपूर्ण प्रकाराची निष्पक्ष चौकशी करून वाजवी बिले द्यावीत आणि ग्राहकांची आर्थिक पिळवणूक त्वरित थांबवावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

**अधिकाऱ्यांना गुलाबपुष्प देत निवेदन**

लासलगाव उपविभागातील उपकार्यकारी अभियंता कार्यालयात जाऊन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक अभियंता अजय साळवे आणि कनिष्ठ अभियंता नितीन निकम यांना गुलाबपुष्प देऊन तीव्र नाराजी व्यक्त केली. शांततामय मार्गाने आंदोलन करत नागरिकांच्या मूलभूत समस्या तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.

सुधारणा न झाल्यास तीव्र जनआंदोलनाचा इशारा

वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, पारदर्शकतेचा अभाव आणि अंदाजे बिलांची पद्धत महावितरणने तात्काळ बंद करावी. या तक्रारींची गांभीर्याने दखल न घेतल्यास आगामी काळात नागरिकांना सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन उभारू, असा स्पष्ट इशारा शहर विकास समितीने दिला आहे.

**आंदोलनात यांची होती उपस्थिती :** या गांधीगिरी आंदोलनात शहर विकास समितीचे प्रकाश पाटील, धर्मेश जाधव, संदीप उगले, प्रमोद पाटील, चंद्रकांत नेटारे, राजेंद्र कराड, शेखर कुलकर्णी, विकास कोल्हे, संतोष बोराडे, महेश बकरे, उत्तम वाघ, अनिल भागवत, संतोष कोटकर, संतोष पानगव्हाणे, नरेंद्र व्यास, अनिल भावसार, मोरे सर, यश भोगे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अक्षराज






## वाचन प्रेरणा दिन !

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतः ला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

**–श्याम ठाणेदार**

# स्त्री शक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का?

**नवरात्री आणि आपली आजची मानसिकता,** या विषयाकडे पाहताना असे लक्षात येते की, काळानुसार मानवी स्वभाव, जीवनशैली आणि श्ध्दा ठेवण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात नवरात्रीच्या नऊ दिवसांकडे आणि मानसिकतेकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन समोर येतात. नवरात्री आणि आजची मानसिकता या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध अत्यंत रंजक आणि विचार करायला लावणारा आहे. नवरात्र हा केवळ नऊ दिवस उपवास करण्याचा, गरबा खेळण्याचा किंवा धार्मिक विधींचा सण राहिलेला नाही, तर तो आजच्या मानवी मानसिकतेचे आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब बनला आहे.

पूर्वी नवरात्र हा प्रामुख्याने कडक उपवास, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा आणि अध्यात्माचा काळ मानला जायचा. आजच्या मानसिकतेत श्ध्दा कायम आहे, पण तिचे स्वरूप अधिक उत्सवप्रिय आणि सामाजिक झाले असून भक्तीपेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व आले आहे. गरबा, दांडिया, नऊ रंगाचे कपडे घालणे आणि सोशल मीडियावर फोटो शेअर करणे याभोवती तरुणाई अधिक फिरताना दिसते. भक्तीची जागा ब-याच अंशी मनोरंजनाचे आणि ताणतणाव विसरण्याच्या साधनाने घेतली आहे. गरबा आणि दांडिया हे आता मोठे व्यावसायिक इव्हेंट्स झाले आहेत. महागडे पासेस, डिझायनर कपडे यावर होणारा खर्च आजच्या दिसण्याच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतो. आजच्या मानसिकतेची एक नकारात्मक बाजू म्हणजे या सणाचे झालेले प्रचंड व्यापारीकरण. नऊ दिवसांचे पासेस, महागडे कपडे, इव्हेंट्स आणि स्पॉन्सर्स यांच्या गर्दीत सणाचा मूळ गाभा आणि साधेपणा काहीसा हरवत चालला आहे. गरब्यासाठी महागडे पासेस, डिझायनर कपडे यामुळे या सणाचे स्वरूप थोडे व्यावसायिक झाले आहे. यामुळे कधीकधी मूळ आध्यात्मिक भाव मागे पडतो की काय, अशी शंका येते. अनेकांसाठी हा सण आध्यात्मिक अनुभूतीपेक्षा 'स्टेटस सिम्बॉल' किंवा दिखाव्याचे माध्यम बनत चालला आहे.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावाचे झाले आहे. अशा वेळी नवरात्रीचे नऊ दिवस अनेक लोकांसाठी मानसिक शांतता आणि डिटॉक्स करण्याचा काळ बनला आहेत. पूर्वी उपवास हा केवळ धार्मिक भाग होता, आज लोक याकडे आरोग्य आणि शरीराला विश्रांती देण्याच्या मानसिकतेतूनही पाहतात. दैनंदिन तणावातून काही काळ बाजूला होऊन मन सकारात्मक ऊर्जेने भरण्यासाठी लोक या दिवसांत देवीची उपासना करतात. नऊ दिवस केली जाणारी प्रार्थना किंवा ध्यान लोकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे साधन वाटते. आजच्या 'डिजिटल' युगात माणूस स्क्रीनला खिळलेला असतो. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना घराबाहेर पडून, मित्रांना भेटण्याची आणि गरब्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची



संधी देतात. त्यामुळे गरबा आणि दांडिया हे केवळ नृत्य राहिले नसून, ते आजच्या पिढीसाठी ताणतणाव विसरून मुक्तपणे जगण्याचे आणि आनंद साजरा करण्याचे माध्यम बनले आहे. तसेच हा सण आता केवळ घरात पूजेपुरता मर्यादित न राहता, एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक मोठा सामाजिक सोहळा बनला आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर विजय मिळवणे हा या सणाचा खरा उद्देश आहे.

नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा उत्सव. आजचा सुशिक्षित समाज या नऊ दिवसांत स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल उघडपणे बोलू लागला आहे. स्त्रीला केवळ 'अबला' न मानता तिचे 'दुर्गा' रूप स्वीकारण्यास तयार होत आहे म्हणजेच आजची मानसिकता या संकल्पनेला अधिक प्रगल्भतेने पाहू लागली आहे. एकीकडे समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे याविषयीची जाणीव वाढली आहे म्हणजेच सकारात्मक बदल दिसून येत आहे. तर दुसरीकडे द्वंद्व ही पहायला मिळत आहे. नऊ दिवस देवीची मनोभावे पूजा करतो. पण समाजात ख-या आयुष्यातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा त्यांच्याशी होणारा दुजाभाव थांबवायचा नाही म्हणजेच दुर्लक्ष करायचे. नवरात्रीत आपण दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा करतो. लहान मुलींना देवी मानून त्यांचे पादपूजन करून पाय पडतो. पण दुसरीकडे, समाजात महिलांविरुध्दचे गुन्हे आणि मानसिक छळ कमी झालेला नाही. नऊ दिवस ज्या स्त्री शक्तीला आपण पूजतो, त्याच स्त्रीचा रोजच्या आयुष्यात किती आदर केला जातो म्हणजे महिलांची सुरक्षितता आणि आदर हा आजच्या मानसिकतेसमोरील मोठा प्रश्न आहे. आधुनिक महिला आता या सणाकडे स्वत:मधील 'दुर्गा' (आत्मविश्वास आणि शक्ती) जागृत करण्याचे माध्यम म्हणून पाहत आहे. आजची स्त्री अन्यायाविरुध्द आवाज उठवण्यासाठी नवरात्रीच्या ऊर्जेचा वापर करत आहे.

आजच्या न्यूक्लियर फॅमिली आणि डिजिटल जगात माणूस एकटा पडत चालला आहे. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना एकत्र आणतात, ज्यामुळे 'एकटेपणाची मानसिकता' दूर होऊन समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि मानसिक प्रवासाला एक नवी ऊर्जा मिळते. सर्व मतभेद, जात-पात बाजूला ठेवून एकत्र नाचणे, आनंद साजरा करणे यामुळे समाजातील एकतेची भावना बळकट होते. वर्षभराच्या थकव्यानंतर मानवी मनाला पुन्हा नवसंजीवनी देणारा हा काळ ठरतो. नवरात्रीच्या नऊ रंगाचे आजच्या काळात वेगळेच वेड आहे. कार्यालयांमध्ये, कॉलेजमध्ये सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालताना दिसून येते. ही मानसिकता 'एकता' आणि 'समानता' दर्शवते. विषमतेच्या भिंती तोडून सर्वांनी एकत्र येण्याची ही आधुनिक मानसिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे आजची मानसिकता नवरात्रीकडे एक पारंपरिक धार्मिक सण म्हणून तर पाहतेच, पण सोबतीला मनोरंजन, सामाजिक एकत्रिकरण आणि मानसिक ऊर्जा मिळवण्याचे एक उत्तम माध्यम म्हणूनही याकडे बघते. नवरात्री हा केवळ एक धार्मिक सण राहिलेला नाही, तर तो सामाजिक एकत्रिकरण, आत्मपरीक्षण आणि मनोरंजनाचा एक मोठा उत्सव बनला आहे. गरज आहे ती फक्त बाह्य भपक्यापलीकडे जाऊन या सणामागील 'स्त्री शक्तीचा आदर' आणि 'अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचा' विचार जपण्याची आणि देवीच्या रूपांमधील संयम, बुध्दी आणि करुणा हे गुण आपल्या दैनंदिन विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची. जेणेकरून ख-या अर्थाने आपल्या मनातील 'महिषासूर' रुपी नकारात्मक विचारांचा मर्दन करता येईल.

आधुनिक काळात लोकांच्या मानसिकतेत एक सकारात्मक बदलही पाहायला मिळत आहे, तो म्हणजे पर्यावरणपूरक नवरात्र. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तींची स्थापना करणे, रासायनिक रंगाऐवजी नैसर्गिक रंगाचा वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा पाळणे याविषयी आजची तरुण पिढी जागरूक होत आहे. हा बदल समाजाच्या प्रगतीशील मानसिकतेचे लक्षण आहे. अनेक मंडळांमध्ये आता महागड्या मूर्ती किंवा सजावटीऐवजी त्या पैशातून रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत किंवा वृक्षारोपण यासारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. म्हणजेच आजची तरुण पिढी अधिक संवेदनशील होताना दिसते. लोक परंपरेचा आदर करत आहेत, पण त्यात स्वत:च्या सोयीनुसार आणि आधुनिक विचारसरणीनुसार बदलही करत आहेत.

भारतीय संस्कृतीत नारीला आदिशक्तीचे रूप मानले गेले आहे. त्यामुळे नवरात्र हा भारतीय संस्कृतील अत्यंत महत्त्वाचा, ऊर्जेचा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा सण आहे. नऊ दिवस चालणा-या या उत्सवात आपण दुर्गेच्या नऊ रूपांची अत्यंत भक्तीभावाने पूजा करतो, उपवास करतो आणि तिचा जयजयकार करतो. हा सण केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो वाईटावर चांगल्याचा विजय आणि स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे प्रतिक आहे. पण नवरात्र संपताच, 'या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता' म्हणणारे आपण, आपल्याच घरातील आणि समाजातील जिवंत स्त्रीशक्तीचा आदर करायला का विसरतो? आपण पुन्हा आपल्या जुन्या मानसिकतेकडे का वळतो? म्हणून स्त्रीशक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? हा आजच्या काळातील आधुनिक समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

एकीकडे आपण स्त्रीला देवीचे रूप मानून तिच्यासमोर नतमस्तक होतो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष आयुष्यात अनेक स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. वर्षातील नऊ दिवस तिची पूजा करणे आणि उर्वरित ३५६ दिवस तिच्या अस्तित्वाचा, तिच्या हक्कांचा आणि तिच्या भावनांचा आदर न करणे, हा एक ढोंगीपणा आहे. ख-या स्त्रीशक्तीचा आदर करायचा असेल, तर तो केवळ काही दिवसांपुरता मर्यादित न राहता दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवा. आजच्या आधुनिक युगातही आपल्याला अनेक विरोधाभास पाहायला मिळतात. नवरात्रीत रात्री उशिरापर्यंत गरबा खेळणा-या मुलींना सुरक्षित वातावरण मिळते, पण एरवी मात्र त्यांना रात्री बाहेर पडताना हजार वेळा विचार करावा लागतो. एका बाजूला 'कन्या पूजन' केले जाते, तर दुस-या बाजूला आजही समाजात मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. घरात आणि कामाच्या ठिकाणी रात्रंदिवस झटणा-या स्त्रीच्या कष्टाला अनेकदा गृहीत धरले जाते.

स्त्रीशक्तीचा खरा आदर केवळ मूर्तीची पूजा करण्यात किंवा तिची स्तुती गाण्यात नाही. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीचे निर्णय घेताना तिला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीला घरात, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानाचे नि रात्रीच्या वेळीही भीतीमुक्त वातावरण मिळायला हवे. तिच्या मताला, तिच्या आवडीनिवडीला महत्त्व आणि तिच्या स्वप्नांवर बंधने न घालता तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य समाजात दिले पाहिजे. मुलांवर लहानपणापासूनच मुलींचा आदर करण्याचे संस्कार झाले पाहिजे. जोपर्यंत आपण घरातल्या स्त्रीला माणूस म्हणून आदर देत नाही, तोपर्यंत मंदिरातील देवीची पूजा व्यर्थ आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी व्यक्ती नसून ती आज अंतराळापासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहे. तिच्यातील या अथांग शक्तीचा आदर रोजच्या व्यवहारात दिसणे गरजेचे आहे.

काळ बदलतो तशा सण साजरा करण्याच्या पद्धती बदलतात हे स्वाभाविक आहे. आजच्या मानसिकतेत जरी आधुनिकता आणि मनोरंजन वाढले असले, तरी सणाचे मूळ मर्म विसरता कामा नये. नवरात्र ही केवळ नऊ दिवस नटण्याची किंवा गरबा खेळण्याची संधी नाही, तर ती स्वत:मधील नकारात्मक विचार, अहंकार आणि वाईट सवयींवर विजय मिळवण्याची पर्वणी आहे. स्त्री ही केवळ नवरात्रीत पुजली जाणारी मूर्ती नाही, तर ती सृष्टीचे चक्र चालवणारी, कुटुंबाला आधार देणारी आणि समाजाची प्रगती साधणारी जिवंत शक्ती आहे. जोपर्यंत आपण आपल्या घरातील आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या कर्तृत्वाचा आणि अस्तित्वाचा आदर करत नाही, तोपर्यंत नवरात्रीच्या पूजेला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणूनच, स्त्रीशक्तीचा आदर हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव न ठरता, तो ३६५ दिवसांचा जीवनमार्ग बनला पाहिजे. आपण समाजातल्या प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण देऊ, तरच ख-या अर्थाने देशात आणि समाजात 'नवरात्र' साजरी होईल.

**- सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

### स्कंधमाता

स्नेहकुंभ भरले तुडूंब
प्रतिपाळ करी जगता
रुप पंचमी जगन्माता
पंचम् रात्रीस जागता

पद्माश्रित तू करद्वया
यशस्विनी स्कंधमाता
शुभदीस्तु सदा देवी
गं नित्य सिंहासनगता

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

भगवान स्कंद कुमार
काखेत बाळ स्वागता
दर्शन मात्रे भया हरण
आदिशक्ती शरणागता

पुजिता पंचमि ललिता
देव्या जागरात रंगता
भर भरुन देशी संपदा
आदिजननीअभ्यागता

सूर्य मंडळा अधिष्ठात्री
प्रभा मंडली संयोगिता
उपासना हो अंतरातून
ध्यान वृत्तीत एकाग्रता

हरपले भान भक्ती रंगे
गरबादांडिया उसळता
नर नारी भेद विरघळे
उत्साहअंगी सळाळता

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# खासगी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन वाढवावे

खासगी आस्थापना तसेच कारखानदारी मध्ये आयुष्य घालवलेल्या श्रमिकाला उतरत्या वयात ईपीएस ९५ अंतर्गत केवळ १००० ते ३००० पर्यंत निवृत्ती वेतन मिळत असल्याचे सत्य वारंवार वृत्तपत्रांतून प्रकट होत असते. एकीकडे सरकारी नोकरदाराला वेतन तर वेतन आणि निवृत्ती वेतन सुद्धा भरमसाठ असते.

(तो त्यांचा हक्क आहे) तर दुसरीकडे खासगी आस्थापनांत तुटपुंज्या वेतनावर गुजरान करणाऱ्या कामगारांना निवृत्त झाल्यावर जर इतके अत्यल्प वेतन मिळत असेल तर त्याने आयुष्याचा उत्तरार्ध कसा काढावा? हा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून खासगी आस्थापनांतील कामगारांना सतावतो आहे. यात वाढ व्हावी म्हणून कामगारांनी हा प्रश्न अनेकदा रेटून धरला असला तरीही, यात अजून पर्यंत यश न येणे म्हणजे शासनाची उदासीनता म्हणावी की कामगार संघटनांची हार, ही विचार करण्यालायक बाब आहे.

खासगी आस्थापनांत आयुष्य वेचतांना अनेकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागते. एकतर बेरोजगारी आणि दुसरे खासगी आस्थापनांची पिळवणूक त्यातल्या त्यात नोकरीची नसणारी शाश्वती अशा तिहेरी कात्रीत सापडलेला कामगार आयुष्यभर कष्ट करूनही उत्तरार्धात सुखाचे जीवन जगू शकेल इतकी कमाई करू शकत नाही. वृद्ध माता पित्यांचा खर्च, मुलांचा शैक्षणिक खर्च करता करता निवृत्तीनंतर त्याचेजवळ कुठली जमापुंजी जुळणार?

निवडणूक आली की प्रत्येक पक्ष नको त्या घोषणा करतात आणि निवडून आल्यावर जनतेला फुकटच्या योजना बहाल करतात. श्रम न करता अनेकांवर घरबसल्या कोट्यवधी रुपयांची उधळण केल्या जाते. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कारखानदारांना कर्जात सवलत देतात. प्रसंगी कर्जमाफी देतात आणि जे कामगार कष्ट करून आपला उदरनिर्वाह चालवतात, त्यांच्याकडे असे दुर्लक्ष करतात. हा दूजाभाव कशाला? आज साधे सुरक्षा गार्ड म्हणून जर कुणी कुठल्या आस्थापनेत नियुक्त असेल तर त्याला बारा बारा तास राबवून देखील पंधरा ते अठरा हजारांच्या वर वेतन मिळत नाही. मग,त्यांनी काय खावं आणि काय वाचवावं? हा प्रश्न आयुष्यभर सतावत असतो.

एखाद्या कारखानदारीत आयुष्य घालवलेला कामगार उतरंडीला थकून जातो. अनेक व्याधींनी त्याला घेरलेले असते. निवृत्ती वेतन म्हणून मिळालेला हा अल्प पैसा त्यांच्या वैद्यकीय उपचारांना देखील पुरत नसतो. मग, अशावेळी इतर दैनंदिन गोष्टींचे काय? हा प्रश्न उभा ठाकतो.

जर शासकीय नोकरदारांना आज चाळीस हजार निवृत्ती वेतन मिळत असेल तर खासगी कर्मचाऱ्यांना निदान दहा हजार तर मिळायला हवे ना! खासगी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन साडे सात हजारांपर्यंत वाढवा म्हणून कितीतरी वर्षांपासून कामगार लढतो आहे. मात्र, सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक पक्षाने कामगारांच्या तोंडाला नेहमीच पाने पुसली आहेत. वाढती महागाई आणि नाना बिमाऱ्यांच्या वाढता आलेख बघता खासगी आस्थापनांत हयात घालवलेल्या कर्मचाऱ्यांचा उत्तरार्ध सुखकर व्हावा याकरिता त्यांचे निवृत्ती वेतन वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

**– लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**
**८४१२८७७२२०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## आजी-माजी खासदारांसह राष्ट्रवादीच्या पदाधिकार्यांनी घेतली शरद पवार यांची भेट

### जिल्हा बँकेच्या निवडणुकी संदर्भात केली चर्चा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी ज्येष्ठनेते शरदचंद्र पवार यांची मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत जिल्हा बँकेची निवडणूक, सहकार क्षेत्रातील सद्यस्थिती आणि पुढील राजकीय रणनीतीवर चर्चा झाल्याची माहिती संबंधितांनी दिली. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील नेत्यांमध्ये चर्चा सुरू असतानाच काही राजकीय गटांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याने निवडणुकीतील समीकरणे गुंतागुंतीची बनली आहेत. अशा परिस्थितीत शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेतून राष्ट्रवादीची पुढील भूमिका काय असेल, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात अनेक वर्षांपासून सहमतीच्या राजकारणाला महत्त्व राहिले आहे. मात्र, यंदाच्या निवडणुकीत जागा वाटप, विविध गटांचे प्रतिनिधित्व आणि संचालकपदांच्या दावेदारीवरून राजकीय हालचाली सुरू आहेत. त्यामुळे बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना कितपत यश मिळते आणि कोणते गट स्वतंत्रपणे मैदानात उतरतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे. या भेटीत विद्यमान खा.नीलेश लंके, माजी खा.सदाशिवराव लोखंडे, जिल्हा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, प्रा.सीताराम काकडे, बँकेचे माजी संचालक अमित भांगरे व दत्तात्रेय पानसरे, केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप शेळके आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राहाता तालुकाध्यक्ष सुधीर म्हस्के यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. पवारांच्या भेटीत नेमकी कोणती दिशा ठरली, याबाबत अधिकृत तपशील समोर आलेला नसला, तरी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आगामी राजकीय हालचालींच्या दृष्टीने या भेटीकडे लक्षपूर्वक पाहिले जात आहे.

## दारू पिण्यासाठी आजीने पैसे न दिल्याने नातवाने केले विष प्राशन

### शासकीय मेयो रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू; वलनी वस्ती गावातील घटना



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** दारू पिण्यासाठी आजीने पैसे देण्यास नकार दिल्याने रागाच्या भरात २५ वर्षीय नातवाने शेतात जाऊन विषारी तननाशक प्राशन केले. उपचारादरम्यान नागपूरच्या मेयो रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला. सदर घटना १४ ऑक्टोबर बुधवारला खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलनी वस्ती गावात घडली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विजय बिरजुलाल सोनवने (२५) वलनी वस्ती, वार्ड क्र १ असे मृत तरुणाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार मृतक विजयला जबरी दारूचे व्यसन होते. १३ ऑक्टोबर मंगळवारला रात्री ११ वाजताच्या दरम्यान मृतक विजयने आपली आजी पारबताबाई यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, यावेळी आजीने पैसे देण्यास नकार दिला त्यामुळे रागाच्या भरात विजयने शेतात जाऊन विषारी तननाशक औषध प्राशन केले. प्रकृती गंभीर झाल्यामुळे विजयचा मित्र आदित्य गजानन शेन्द्रे व कुटुंबीयांनी शासकीय मेयो रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना मध्यरात्री दरम्यान विजयचा मृत्यू झाला. या घटनेची सूचना खापरखेडा पोलिसांना देण्यात आली खापरखेडा पोलिसानी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू केला आहे. मृतक विजय आजी व आई सोबत वलनी वस्ती गावात राहत होता. विजयला दोन भाऊ असल्याची माहिती मिळाली आहे.

## कर्जत शहरात नवरात्र उत्सव जल्लोषात साजरा



**अक्षराज : स्वप्नील देशमुख**

**दि.१४, कर्जत (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात शहर तसेच ग्रामीण भागात नवरात्री उत्सव हा जल्लोषात साजरा होत आहे. कर्जत तालुक्यातील शहर भागातील अत्यंत नामांकित सोसायटी म्हणून ओळखली जाणारी नेमीनाथ सोसायटी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नवरात्र उस्तव मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे.

पहिल्या दिवसा पासून या सोसायटी मद्धे अत्यंत भाव भक्ती पूर्ण वातावरण असते. सकाळी आरती तसेच रात्री आरती असते आरती झाली कि पूर्ण सोसायटीतील सदस्यानसाठी स्नेह भोजनाचा कार्यक्रम असतो.

स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला कि महिला तसेच पुरुष यांचा दांडियाचा कार्यक्रम असतो. नवरात्रीच्या ९ दिवसा मद्दे वीवीध कार्यक्रम आयोजित केले जातात. फॅन्सी ड्रेस गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार तसेच महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच या दिवसात संगीत भजन तसेच हरिपाठ सुद्धा आयोजित केले जाते. या सर्व कार्यक्रमामुळे ह्या परिसरात भावभक्ती पूर्ण वातावरण होते.

## पारनेर – नगर मतदारसंघात टँकर, चारा छावण्या तातडीने सुरू करा

### आमदार दाते यांची उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे आग्रही मागणी; मुंबईत घेतली भेट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर – नगर विधानसभा मतदारसंघातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते यांनी दिनांक १४ ऑक्टोबर रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन मतदारसंघातील जनतेच्या व्यथा आणि पाणीटंचाईचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले.

दुष्काळाच्या झळांनी सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालक त्रस्त होत असताना जनतेला दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली. यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

पारनेर – नगर विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, तसेच पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेल्या इतर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी आग्रही मागणी आमदार दाते यांनी यावेळी केली.

दुष्काळाचा फटका केवळ नागरिकांनाच नव्हे, तर पशुधनालाही बसत आहे. जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन करणे शक्य व्हावे आणि पशुपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी चारा छावण्या किंवा चारा डेपो लवकरात लवकर सुरू करण्याची मागणीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.

**प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घेणे आवश्यक**

दुष्काळाच्या कठीण काळात नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा उपलब्ध करून देणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ग्रामीण जनजीवन टिकवून ठेवण्याची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण जनजीवन यांचे प्रश्न अत्यंत संवेदनशील बनतात. अशा परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घेणे आवश्यक आहे.

**- काशिनाथ दाते (आमदार)**

## चोंभूतमध्ये समता परिषदेच्या शाखेचा उद्घाटन सोहळा उत्साहात

### भुजबळ साहेबांच्या वाढदिवसानिमित्त व महात्मा फुले द्विशताब्दी वर्षानिमित्त आयोजन; नेत्र तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा भरघोस प्रतिसाद




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष राज्याचे अन्न पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनरावजी भुजबळ व समता परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्ताने चोंभूत (ता.पारनेर) येथे आज आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान समता परिषदेच्या शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

जय हनुमान मंगल कार्यालय, चोंभूत येथे झालेल्या या कार्यक्रमात महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष लोंढे, समता परिषद पारनेर तालुकाध्यक्ष नवनाथ खामकर, (एमडी) ग्रुपचे मच्छिंद्र माळी, पारनेर शहराध्यक्ष बबनराव चौरे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अनिल गाडीलकर, सरपंच दत्ता म्हस्के, शाखाध्यक्ष आकेश जमदाडे, बबनराव घुमटकर नेत्र तपासणी पथक तसेच पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनच्या सहकार्याने व समता परिषदेच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिरात अनेक गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नारायणगाव येथे नेण्यात आले. सेवा हीच समता या विचाराने हे शिबिर व शाखा उद्घाटन यशस्वी केल्याबद्दल समस्त ग्रामस्थ चोंभूत व आयोजकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नामदार छगनराव भुजबळ साहेब व माजी खासदार समीर भुजबळ यांचा वाढदिवस यंदा सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात यावा असे आवाहन करण्यात आले होते. त्यादृष्टीने आम्ही चोंभूतसह परिसरातील गरजू रुग्णांसाठी पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन, मोहन ठुसे नेत्र रुग्णालय, नारायणगाव यांच्या सहकार्याने मोफत सवलतीच्या दरात या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये डोळे तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांना मोतीबिंदू असल्यास मोफत शस्त्रक्रियेसाठी नारायणगाव येथे नेले आहे. रुग्णांना जेवण,निवास,काळा चष्मा व औषधे मोफत दिली जाणार आहेत. यावेळी चोंभूत येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शाखेचे उद्घाटनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

**- सुभाष लोंढे**
**(समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष)**

## बावधनमधील ५ आरएमसी प्लांटवर महापालिकेची धडक कारवाई

### 3 विभागांच्या संयुक्त मोहिमेत ५ प्लांट सील; नागरिकांच्या लढ्याला यश




**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.१४, कोथरूड (पुणे) :** बावधन बुद्रुक परिसरातील आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्लांटविरोधात नागरिकांनी उभारलेल्या लढ्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या परवाना व आकाशचिन्ह विभाग, बांधकाम अतिक्रमण विभाग आणि बांधकाम विभागाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई करत परिसरातील पाच आरएमसी प्लांट सील केले. या कारवाईमुळे परिसरातील आर.एम.सी प्लांटचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. परवाना व आकाशचिन्ह विभागाचे उपआयुक्त संदीप कदम, बांधकाम अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त सोमनाथ बनकर आणि कोथरूड–बावधन क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त सुहास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

बावधन बुद्रुकमधील आरएमसी प्लांटविरोधात नागरिकांनी सातत्याने आवाज उठविला होता. अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी आणि पुणे महापालिकेकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर पाच प्लांटवर कारवाई झाल्याचे नगरसेवक किरण दगडे पाटील यांनी सांगितले.

ते म्हणाले, परिसराचे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण जपण्यासाठी नागरिकांनी एकजुटीने लढा दिला. आपल्या हक्कांसाठी एकत्र आलेला जनसमुदाय प्रशासनाला ठोस कारवाई करण्यास प्रवृत्त करू शकतो, हे या कारवाईतून सिद्ध झाले आहे. बावधनच्या हितासाठी हा लढा यापुढेही सुरू राहील.

**प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह !**

आरएमसी प्लांटवर कारवाई झाली असली, तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित प्लांटविरोधात पर्यावरण नुकसानभरपाई निश्चित करणे आणि आवश्यक बंद आदेश काढण्याबाबत अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत, असा आरोप ॲड.कृणाल घारे यांनी केला.

नागरिकांच्या एकजुटीची ताकद या कारवाईतून सिद्ध झाली आहे. मात्र, संबंधित यंत्रणांनी आपली वैधानिक जबाबदारी पार पाडली नाही, तर हा लढा कायदेशीर मार्गाने पुढे नेण्यात येईल,

५ आरएमसी प्लांट सील करण्याच्या कारवाईनंतर संबंधित प्लांटच्या पुढील कार्यवाहीबाबत महापालिका प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. परिसरातील नागरिकांना दिलासा मिळण्यासाठी तसेच पर्यावरणाचे संरक्षण होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सातत्याने लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पाऊस नसल्याने धान पीक करपले; हतबल शेतकऱ्याने उभ्या पिकात बांधले बैलं

**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.१४, चिमूर :** पावसाने ऐन गरजेच्या वेळी दीर्घकाळ दडी मारल्याने हातातोंडाशी आलेले धानाचे पीक डोळ्यांदेखत करपत चाललें आहे. लाखो रुपयांचा खर्च करून आणि रात्रंदिवस घाम गाळून जोपासलेले पीक पाण्याअभावी वाळून गेल्याने अत्यंत हतबल झालेल्या चिमूर तालुक्यातील खांबाडा येथील वामन ताजने या शेतकऱ्याने आपल्या उभ्या धान पिकात बैल चरण्यासाठी बांधली आहेत.

मान्सूनचा परतीचा पाऊस गायब झाल्याने आणि कडक ऊन पडत असल्यामुळे शेतातील पाणी आटले आहे. जमिनीला मोठ्या भेगा पडल्या असून धानाचे पीक लोंब्या लागण्याच्या अवस्थेतच जळून गेले आहे.



शेतकऱ्याची हतबलता: लागवडीचा, खतांचा आणि मशागतीचा खर्चही निघणे कठीण झाल्यामुळे आता पिकाची कापणी करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही कापणीचा खर्च वाया घालवण्यापेक्षा शेतकऱ्याने हे वाळलेले पीक जनावरांना चारा म्हणून खाऊ घालण्याचा अत्यंत वेदनादायक निर्णय घेतला.

उभ्या पिकात बैल आणि वासरे चरताना पाहून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. डोळ्यांदेखत पीक जळताना पाहण्यापेक्षा जनावरांना तरी चारा मिळेल, अशी आर्त भावना संबंधित शेतकऱ्याने व्यक्त केली आहे.

# ब्लास्टिंगच्या हादऱ्यांनी टेंभुर्ली - मांजरे हादरले

## पंचनामे होऊनही भरपाई नाही? प्रशासनाच्या कारवाईवर ग्रामस्थांचा सवाल

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील डोलखांब महसूल मंडळांतर्गत टेंभुर्ली आणि मांजरे गावालगत सुरू असलेल्या दगडखाण व स्टोन क्रशर परिसरातील ब्लास्टिंगमुळे घरांना हादरे बसत असून, भिंतींना तडे गेल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. घरांच्या भिंती, छताच्या जोडण्या आणि दरवाजांच्या चौकटीजवळ भेगा पडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दगडखाण परिसरात ब्लास्टिंग होत असताना आसपासच्या घराला तीव्र हादरे जाणवतात. या हादऱ्यांमुळे घरांच्या भिंतींना तडे गेल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून, काही ठिकाणी भेगा वाढत असल्याने घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तलाठी स्तरावर पंचनामे; पुढील कारवाईचे काय?

या प्रकरणाची माहिती टेंभुर्ली येथील नागरिकांनी तलाठी रणदिवे यांना दिल्यानंतर संबंधित घरांची पाहणी करून नुकसानाचे पंचनामे करण्यात





आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, पंचनामे होऊनही नुकसानग्रस्तांना भरपाई मिळालेली नसल्याचा दावा स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. पंचनामे झाले, मग पुढील कारवाई कुठे अडकली?

नुकसान भरपाई कधी मिळणार?असा सवाल टेंभुर्ली आणि मांजरे येथील ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. दगड खाणीच्या ब्लास्टिंगची तांत्रिक तपासणी करण्याची मागणीघरांना पडलेल्या तड्यांचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक तपासणी आणि इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. संबंधित दगड खाणीत ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्या आहेत का, निर्धारित नियमांचे पालन केले जाते का, तसेच ब्लास्टिंगमुळे निर्माण होणाऱ्या कंपनांची नोंद ठेवली जाते का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. स्थानिक ग्रामस्थ दमयंती चौधरी यांनीही पंचनाम्यांनंतर नुकसानग्रस्तांना मदत किंवा भरपाई मिळाली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. महसूल विभाग, तहसील प्रशासन, खनिकर्म विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

प्रशासन कारवाई करणार का?ब्लास्टिंगमुळेच घरांना तडे गेले आहेत की त्यामागे अन्य कारणे आहेत, हे अधिकृत तांत्रिक तपासणीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. तपासणीत ब्लास्टिंगमुळे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार नुकसानग्रस्तांना भरपाई मिळवून द्यावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

आता प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करणार का?

पंचनाम्यांनंतर प्रलंबित असलेल्या कारवाईबाबत स्पष्टीकरण देणार का? आणि नुकसानग्रस्त कुटुंबांना न्याय कधी मिळणार?

याकडे टेंभुर्ली-मांजरे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# थोडक्यात बातम्या

## बोरीतील १४ नागरिकांना मिळणार निराधार पगारीचा लाभ

### पालकमंत्री बोर्डीकरांच्या मार्गदर्शनाखाली कामांची पूर्तता

संजय गांधी निराधार अनुदान योजना

**अक्षराज : जफर शेख**

**दि.१४, बोरी (परभणी) :** परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंजूर यादीतील लाभार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे. समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली असून बोरी येथील १४ नागरिकांच्या खात्यावर लवकरच काही दिवसात निराधार योजनेची पगार पडणार असल्याचे निराधार समितीचे सदस्य गजानन चौधरी यांनी सांगितले. जिंतूर तालुक्यातील बोरी येथील चौदा नागरिकांचा निराधार योजनेच्या मंजूर यादीत समावेश झालेला आहे.

या नागरिकांना काही दिवसांपूर्वी पालकमंत्री नामदार मेघनाताई बोर्डीकर यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सुद्धा वाटप करण्यात आले. यामध्ये दिव्यांग, विधवा, परित्यक्ता, वर्धापकाळ आदी महिला व नागरिकांचा समावेश आहे. यानंतर निराधार समितीचे अध्यक्ष डॉ.पंडितराव दराडे, तहसीलदार शितल कच्छवे, नायब तहशीलदार प्रशांत राखे यांच्या सूचनेनुसार मंजूर यादीतील या सर्व लाभार्थी नागरिकांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्यात आली. याकामी निराधार योजना समिती सदस्य गजानन चौधरी, माधव राठोड, दिपाली ठाकूर, संतोषराव माने, अंकुश बकान, रामेश्वर पोंदाळ, रवी रणबावळे, कार्यालय कर्मचारी दैवशाला कुऱ्हे,ए.एस.घुगे, शुभम आडके यांनी परिश्रम घेतले. **पालकमंत्री नामदार मेघनाताई बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समितीचे अध्यक्ष डॉ.पंडितराव दराडे यांच्या अध्यक्षतेखाली पुढील काही दिवसात बैठक होणार आहे. बोरी येथील त्रुटीच्या यादीतील नावे व नवीन लाभार्थी नावे यांच्या प्रक्रियेबद्दल चर्चा होणार असल्याचे बोरीचे निराधार योजना समिती सदस्य गजानन चौधरी यांनी सांगितले.**

# मतदारसंघातील १० कोटींच्या रस्ते विकासकामांना राज्याची प्राथमिक मंजुरी

## आ. काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश; केंद्राकडे प्रस्ताव सादर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासाला चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

मतदारसंघातील चार रस्त्यांच्या सुधारणांसह एका पुलाच्या बांधकामासाठी एकूण १० कोटी रुपयांच्या कामांना राज्य शासनाची प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत (उठखऋ) ही कामे प्रस्तावित असून, राज्य शासनाच्या मंजुरीनंतर हे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत, अशी माहिती आ. दाते यांनी दिली.



ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ होणे, प्रवासाचा वेळ कमी होणे आणि शेतकरी, नागरिक व वाहनचालकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळणे या दृष्टीने ही कामे अत्यंत महत्त्वाची आहेत. राज्याची प्राथमिक मंजुरी मिळाली असून लवकरच केंद्राची अंतिम मंजुरी मिळून निधी उपलब्ध होईल.

**- आ. काशिनाथ दाते**

**मंजूर कामांचा तपशील असा :**

**१. टाकळी ढोकेश्वरपुलासाठी - १.५० कोटी :**

राहता-लोहारे-मांडवा-पारनेर-श्रीगोंदा रस्त्यावरील राज्य मार्ग क्र. ६७ च्या कि.मी. ७९/५०० येथे पोहोच रस्त्यासह टाकळी ढोकेश्वर-कान्हूरपठार रोडवरील सबस्टेशनपुढील लहान पुलाचे बांधकाम.

**२. कौठा-रांजणगाव रस्ता सुधारणा - ३ कोटी :**

कौठा-अनगरे-आर्वी-अजनुज-श्रीगोंदा-सुराडी-कोळगाव-सुरेगाव-उखलगाव-रांजणगाव-वाळवणे ते राज्य मार्ग क्र. ६९ ला जोडणाऱ्या रस्त्यावरील (राज्य मार्ग ४७९) कि.मी. ५७/९०० ते ६०/४५० टप्प्याची सुधारणा.

**३ व ४. भाळवणी परिसरातील दोन रस्ते - ५.५० कोटी :**

पारनेर-जामगाव-भाळवणी रस्त्यावरील (प्रमुख जिल्हा मार्ग ५२) कि.मी. १८/०० ते १९/०० साठी २.७५ कोटी आणि भाळवणी-गोरेगाव-किन्ही-कान्हूर-वडगाव दर्या-दरोडी-रांधे-अळकुटी-चोंभूत रस्त्यावरील (प्रमुख जिल्हा मार्ग ५०) कि.मी. ०/०० ते १/०० साठी २.७५ कोटी, म्हणजेच भाळवणी गावातून नगर व टाकळी ढोकेश्वरच्या बाजूने जाणाऱ्या दोन्ही रस्त्यांसाठी एकूण ५.५० कोटी.

# 'चारा मित्र' संकल्पनेतून पशुधनासाठी चारा सुरक्षितता; पशुपालकांनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, नांदेड :** अल्-निनोच्या प्रभावामुळे पाणीटंचाईची शक्यता असून आगामी काळात पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भेडसावण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'चारा मित्र' ही संकल्पना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वतःच्या शेतात पाण्याची उपलब्धता असलेल्या आणि चारा पिकांची लागवड करण्यास इच्छुक व्यक्तींना प्रशासनामार्फत कमी पाण्यात व लवकर येणाऱ्या चारा पिकांच्या वाणांचे बियाणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी अधिकाधिक पशुपालकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. चारा लागवडीसाठी इच्छुकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून 'चारा मित्र' म्हणून नाव नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कर्डिले यांनी केले आहे.

अतिरिक्त चाऱ्याचा इतर पशुपालकांना होणार उपयोग'चारा मित्र' संकल्पनेअंतर्गत लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याचा प्रथम संबंधित पशुपालक आपल्या पशुधनासाठी वापर करू शकतील. त्यानंतर उपलब्ध होणारा अतिरिक्त चारा गरजू पशुपालकांच्या पशुधनासाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर चाऱ्याची उपलब्धता वाढण्यास तसेच संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यास मदत होणार आहे.जिल्ह्यात १८२ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून या दवाखान्यांमार्फत पशुपालकांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी विलंब न करता संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून नोंदणी करावी, असे ही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पशुधन विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहनदुष्काळी परिस्थितीत पशुधनाची हानी झाल्यास पशुपालकांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने पशुधन विमा योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत विमा हप्त्याच्या ८५ टक्के रकमेचे अनुदान शासनाकडून, तर उर्वरित १५ टक्के रक्कम संबंधित पशुपालकाने भरावयाची आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्ती अथवा दुष्काळामुळे पशुधनाची हानी झाल्यास विम्याच्या माध्यमातून मोठी आर्थिक मदत मिळू शकते. त्यामुळे सर्व पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

**सीएसआरच्या माध्यमातून पशुधन विम्यासाठी सहकार्याचे आवाहन**

सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून अनेक उद्योग, संस्था व व्यक्ती विविध सामाजिक उपक्रमांना मदत करण्यास इच्छुक असतात. अशा उद्योग व संस्थांनी सीएसआर निधीतून गावातील पशुपालकांच्या पशुधनाचा विमा उतरविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.कंधार तालुक्यातील बहादूरपुरा येथे एका कुटुंबाने संपूर्ण गावातील पशुधनाचा एक वर्षाचा विमा उतरवून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला होता. या उपक्रमाची राष्ट्रीय पातळीवर ही दखल घेण्यात आली होती. त्याच धर्तीवर इतर गावांमध्येही अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

३० ऑक्टोबरच्या सीएसआर कार्यशाळेत होणार नियोजनजिल्ह्यातील सीएसआरच्या माध्यमातून कार्यरत उद्योग, संस्था व संबंधित घटकांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. दि. ३० ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सीएसआर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यशाळेत पशुधन विमा तसेच 'चारा मित्र' संकल्पनेसाठी सीएसआरच्या माध्यमातून करता येणाऱ्या सहकार्याबाबत नियोजन करता येणार आहे.

संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर 'चारा मित्र' उपक्रमात सहभागी होऊन चारा लागवडीसाठी पुढाकार घेणाऱ्या नागरिकांनी तसेच सर्व पशुपालकांनी पशुवैद्यकीय दवाखान्यांशी तातडीने संपर्क साधून नोंदणी करावी आणि पशुधन विमा योजनेचाही लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# डोरली गावात बिबट्याची दहशत; वनविभाग प्रशासन १० लाईव्ह कॅमेरे व २ पिंजरे लावणार

## गोठ्यातील एका बकऱ्याचा पाडला फडशा तर एक बकरी गंभीर जखमी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** पारशिवनी तालुक्यातील डोरली गावात मागील काही महिन्यांपासून बिबट्याच्या धुमाकूळ सुरू आहे. बिबट्याने १४ ऑक्टोबर बुधवारला पहाटेच्या सुमारास डोरली गावात हल्ला केला. डोरली गावातील सदाशिव उके यांच्या गोठ्यात शिरून बिबट्याने एका बकऱ्याचा फडशा पाडला तर एक बकरी गंभीर जखमी झाल्याने डोरली गावात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, डोरली गावातील रहिवासी सदाशिव शिवार उके यांच्या घराच्या गोठ्यात काही जनावरे बांधलेली होती. बुधवारी पहाटेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून एका बकऱ्याचा फडशा पाडला तर दुसऱ्या बकरीवर हल्ला करून गंभीर जखमी केले. यावेळी जनावरांचा किंचाळण्याचा आवाज ऐकून सदाशिव उके व त्यांच्या कुटुंबीयांनी गोठ्याकडे धाव घेताच बिबट्याने पळ काढला. सदर घटनेची माहिती पारशिवनी वनपरिक्षेत्र विभागाला देण्यात आली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी जे.पी.मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक पी.एम.गाडेकर, शुभांगी कुरंजेकर तसेच वनमजूर रमेश कोहळे व मिथुन काळसर्पे यांनी घटनास्थळी धाव घेतली अधिकाऱ्यांनी पंचनामा केला.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी परिसरात तातडीने १० लाईव्ह कॅमेरे आणि २ पिंजरे लावण्यात येत असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी जे.पी.मेंढे यांनी सांगितले, शिवाय नवरात्र दरम्यान रास गरबा किंवा इतर कार्यक्रमांच्या वेळी लहान मुले व महिलांनी रात्री उशिरा विनाकारण घराबाहेर पडू नये व सायंकाळच्या वेळी उघड्यावर शौचास जाण्यास टाळण्याचे आवाहन केले.

---

**नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत शेतकरी!**

डोरली, शिंगोरी, सावली, भानेगाव व बिनासंगम आदी परिसरात मागील अनेक महिन्यांपासून बिबट्याचा वावर सुरू आहे यादरम्यान बिबट्याने अनेक पशुधनाची शिकार केली आहे शासनाकडून पंचनामे करण्यात आले मात्र शासनाकडून आर्थिक मदत मिळालेली नाही आधीच दुष्काळ पडलामूळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे त्यातच पशुधनाच्या नुकसानीमुळे हवालदिल झाला आहे शासनाने त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकरी बांधवा कडून केली जात आहे.

# गलवाडा येथे धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा; सामूहिक पुष्पहार अर्पण करून महामानवांना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, सोयगाव (छ. संभाजीनगर):** तालुक्यातील गलवाडा येथे ७० वा धम्मचक्र परिवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सामूहिक पुष्पहार अर्पण करून महामानवांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्रामणेर मुकुंदा वाहुळे, सखाराम इंगळे, आनंदा इंगळे, सोयगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक भारत तायडे, रवींद्र बिरारे, सुधाकर खरे, पंढरी इंगळे, रमेश चक्के, साहेबराव बिरारे, माजी सरपंच सुरेखा तायडे, माजी सदस्य सुशीला इंगळे, अनुसयाबाई सोनवणे, कविताबाई वाघ, वंदनाबाई वाघ, लक्ष्मीबाई सोनवणे, निर्मलाबाई बिरारे, नंदाबाई खरे, शारदा सोनवणे, पंचशीलाबाई, मायाबाई बिरारे, माही सोनवणे, स्विटी सोनवणे यांच्यासह बौद्ध उपासक-उपासिका आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

